अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ११/०२/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०७/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | विशाल गोविंद यादव, पोलीस हवालदार क्र. ०४१०७३, आर्थिक गुन्हे शाखा, सी.बी. कंट्रोल, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. १०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचा तंबाखु व सुपारीचा किरकोळ विक्रीचा व्यवसाय आहे. सदरहू व्यवसाय चालू ठेवण्यासाठी तसेच व्यवसायात मदत करण्याकरीता लोकसेवक श्री. विशाल गोविंद यादव, पो.ह.क्र. ०४१०७३, आर्थिक गुन्हे शाखा, सी.बी.कंट्रोल, मुंबई यांनी तक्रारदार यांना गुडलक म्हणून रू.५,०००/- व दरमहिन्याला रू. १०,०००/- लाच दयावी लागतील असे सांगून दर महिन्याच्या ५ ते ७ तारखेला ठरल्याप्रमाणे पैसे दिले तर धंदा चालू ठेव असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवकास गुडलक म्हणून रू.५,०००/- दिले होते. त्यानंतर दिनांक ०७/०२/२०२५ रोजी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना मोबाईलवर संपर्क करून पैसे घेवून आला नाहीस अशी विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सोमवार दिनांक १०/०२/२०२५ रोजी येवून भेटतो असे सांगितले. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १०/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी व मदत करण्यासाठी लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. १०,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- **श्री. प्रविण नावडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. सोपान चिट्टमपल्ले, सहाय्यक पोलीस आयुक्त**
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

११/२/२५

( राहूल बाबुराव कारभारी )
पोलीस निरीक्षक,
अति. कार्यभार सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net